
# मराठी साहित्यातील नवे विचारप्रवाह




मुख्य संपादक :

प्राचार्य डॉ. किशन पवार

सहसंपादक :

डॉ. रामहारी मायकर

प्रा. अशोक खेत्री

○ **मराठी साहित्यातील नवे विचारप्रवाह**
Marathi Sahityatil Nave Vicharpravah

○ **प्रथमावृत्ती :** ०७ फेब्रुवारी, २०२०

○ **प्रकाशक**
आदित्य प्रकाशन,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर-४१३५१२
☎ 02382-257126, Mob. 9405759888

○ **ISBN-978-93-83109-63-0**

○ **मुद्रणस्थळ**
आदित्य ऑफसेट, लातूर.

○ **अक्षर जुळवणी**
श्री. बालाजी बनसोडे

○ **मुखपृष्ठ**
श्री. तानाजी माने, लातूर.

○ **मूल्य :** ३००/-

| अ.क्र | नाव | शीर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| २७. | प्रा.डॉ.राजकुमार किशनराव यल्लावाड | मराठीतील पर्यावरणवादी साहित्य | १५४ |
| २८. | प्रा.डॉ.लक्ष्मण गित्ते | विस्थापीताचे साहित्य | १५९ |
| २९. | प्रा.डॉ.बालासाहेब कोंडीबा जाधव | पर्यावरणवादी साहित्य | १६२ |
| ३०. | प्रा. पोकळे आबासाहेब नवनाथ | मराठी प्रादेशिक कादंबरी | १६६ |
| ३१. | प्रा.डॉ.मायकर आर.बी. | विज्ञानवादी साहित्य : एक अभ्यास | १७२ |
| ३२. | दिपक रायभान कारके | उपेक्षित प्रवाहातील मातंग समाज आणि संस्कृती | १७६ |
| ३३. | डॉ. महादेव जगताप | प्रादेशिक दृष्टिकोनातून 'फेसाटी' चा विचार | १८१ |
| ३४. | डॉ. सोपान सुरवसे | गावठाण प्रादेशिक कादंबरी समुह जीवनाची व्यथा | १८७ |
| ३५. | प्रा. अशोक शिलांबरराव खेत्री | विज्ञानवादी साहित्य | १८९ |
| ३६. | प्रा. महारूद्र जगताप | विस्थापित मराठी साहित्य | १९५ |
| ३७. | डॉ. गायत्री सोपान गाडेकर | कथेतील उपेक्षित स्त्री : देवदासी | २०० |
| ३८. | प्रा.गणेश शिवाजी मारेवाड | तेराव्या शतकातील उपेक्षित संत | २१२ |
| ३९. | डॉ.गणेश मदनराव शिंदे | मराठवाड्यातील दलित नाटककार दत्ता भगत | :२१७ |
| ४०. | डॉ.कैलास इंगळे | मराठी प्रादेशिक साहित्य — स्वरुप आणि व्याप्ती | २२१ |
| ४१. | प्रा.केंद्रे सिता लक्ष्मणराव | आठवणींचे पक्षी मधील समाजजीवनाचे स्वरुप | २२६ |
| ४२. | डॉ.राखी सिद्राम सलगर | अनुवादीत साहित्यात भगवान ठग यांचे योगदान | २२८ |
| ४३. | डॉ.सोळंके चत्रभुज नारायणराव | 'अण्णा भाउंची कादंबरी' | २३२ |
| ४४. | डॉ. दैवत दिनकर सावंत | विस्थापन आणि जागतिकीकरण | २३६ |
| ४५. | शेख चॉदपाशा रज्जाक | अल्पसंख्याक समुदायाचे साहित्य | २४१ |
| ४६. | डॉ. फारुक अहमद तांबोळी | साठोत्तरी मुस्लिम मराठी कविता | २४९ |

# विस्थापित मराठी साहित्य

प्रा. महारूद्र जगताप
मराठी विभाग,
बलभीम महाविद्यालय, बीड
मो.नं. ९७६३४२३८३

प्रास्ताविक :

'विस्थापन' संकल्पना व्यापक, संमिश्र आणि समाजसापेक्ष आहे. मानवाच्या ...णाऱ्या स्थलांतरातून विस्थापन ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. स्थलांतर हा ...नवाचा स्थायी गुणधर्म मानला जातो. पूर्वी माणसे पाण्याची जागा पाहून जंगलात ...गणाऱ्या आगी पासून स्वंसरक्षणार्थ स्थलांतरित व्हायची पुढे सत्ताकांक्षेतून होणाऱ्या ...लढाया व आंदोलने तसेच महामारी सारखे साथीचे रोग, दुश्काळ यामुळे माणसांवर स्थलांतरित होण्याची वेळ आली. हे स्थलांतर कधी हंगामी, तर कधी कायम स्वरूपाचे असे ऊसतोडणी कामगार, वीटभट्टी कामगार, चिरे खाणकामगार, गोदी कामगार यांचे स्थलांतर उत्पन्न व प्रर्जन्य हयांच्यावर आधारलेले हंगामी स्वरूपाचे असते. परंतु धरणे, सेझ अंतर्गत उद्योग, फाळणी या सारख्या कारणांनी होणारे स्थलांतर हे कायम स्वरूपाचे असते. साम्राज्यवादाच्या उदयानंतर भांडवलषाही अर्थव्यवस्थेमुळे स्थलांतराची जागा विस्थापनाने घेतली. कारण स्थलांतरे ही जाणीवपूर्वक व स्वयंस्फूर्तीने होत. मात्र विस्थापन हे समाजावर लादले गेले. अस्मानी सुलतानी संकटाचे फलित म्हणून 'विस्थापन' ही संकल्पना अस्तित्वात आली. विस्थापित म्हणजे उखडले गेलेले, फेकले गेलेले, हाकलले गेलेले स्थलांतरित होय. हे विस्थापितांचे विस्थापन होण्यामागे निसर्ग व मानव कारणीभूत आहेत. निसर्ग हा लहरी असतो. तो कोणते रूप कधी धारण करेल हे सांगता येत नाही. त्यामध्ये माणसाने स्वार्थापोटी त्याच्यावर सर्व बाजूंनी अतिक्रमण केल्यामुळे आज तो खूपच असंतूलित झाला आहे. याचा प्रत्यय भूकंप, चक्रिवादळे, दुष्काळ, त्सुनामी, अतिवश्ष्टी, अकाली पर्जन्य अशा अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीतून मानवाला येतो आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या विस्थापनाचे खापर माणुस दैवावर व निसर्गावर फोडून मोकळा झाला. परंतु स्वत:च्याच हाताने मानसाने स्वार्थासाठी विकासाची प्रक्रिया घडवित असतांना जेथे ही प्रक्रिया राबविली जाते तेथील भूमिपुत्रांना कायमचे विस्थापित केले. या विस्थापनास सरळ—सरळ शासकीय धोरणे व हितसंबंधाची जपवणूक, धनाढय भांडवलदाराची अर्थनीती हया बाबी कारणीभूत ठरत आहेत. विस्थापनाच्या कारणा संदर्भात शंकर सखाराम म्हणतात, ''आमच्याकडे बहुतेक चांगल्या योजना भांडवलदार